# विपश्यना साधक

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. 30/-
आजीवन शुल्क रु. 500/-

**बुद्धवर्ष २५५८, भाद्रपद पौर्णिमा, ९ सप्टेंबर, २०१४ वर्ष १ अंक ५**

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः - http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx

## धम्मवाणी

**वाचानुरक्खी मनसा सुसंवुतो, कायेन च नाकुसलं कयिरा।**
**एते तयो कम्मपथे विसोधये, आराधये मग्गमिसिप्पवेदितं॥**

*धम्मपद- २८१, मग्गवग्गो.*

वाणीला संयमित ठेवावे, मनाला संयमित ठेवावे व शरीराने कोणतेही अकुशल (काम) करू नये. ह्या तिन्ही कर्मपथां (कर्मेंद्रियां) ची शुद्धता करावी. ऋषीं (बुद्धां) च्या सांगितलेल्या (अष्टांगिक) मार्गाचे अनुसरण करावे.

## परम पूज्य गुरुदेवांची प्रथम पुण्यतिथी

२९ सप्टेंबर पूज्य गुरुदेवांची पुण्यतिथी ठरली. ही तेवढीच महत्वपूर्ण आहे जितकी ३० जानेवारीची त्यांची जन्मतिथी. जन्म झाल्यावर एक सत्व समाजात येते. हळूहळू जीवन विकसित होत जाते आणि ते सत्व कर्म करते. एखाद्याची चांगली-वाईट कर्म न केवळ त्याच्या स्वतःच्या सुख-दुःखांचे कारण होतात, तर समाजालाही प्रभावित करतात, दिशा प्रदान करतात. ज्या कोणाद्वारे केले गेलेले चांगले कार्य अनेकांसाठी मंगलदायक सिद्ध होते, तोच जगात पूज्य बनतो. त्याच्या सांगितलेल्या मार्गावर चालून न जाणे किती लोकांचे कल्याण होते. गुरुजी असेच एक सत्व होते, ज्यांनी ह्या जगाला सर्वोच्च विद्येचे दान दिले, जी मनुष्यांना सा-या दुःखातून मुक्त करते. त्यांनी सांगितलेल्या धर्म मार्गावर चालून न जाणे किती लोकांचे कल्याण झाले आहे व पुढेही होत राहील.

पुण्यतिथी अशी असते जी न केवळ जीवनभरच्या कामांची आठवण देत राहाते, तर त्यांना सांभाळून ठेवण्यासोबतच प्रेरणादायीही बनते.

गुरुजींसोबत माझा ७३-७४ वर्षांपर्यंत थेट संपर्क राहिला आणि आज जरी त्यांचे शरीर आपल्यासोबत नसले तरीही ते सान्निध्य त्याचप्रकारे कायम आहे. अनेक साधकांचे अनुभव दर्शवतात की पूज्य गुरुजींची मंगल मैत्री व त्यांचे सान्निध्य पूर्वीप्रमाणेच अनुभवायला मिळते. हे एकदम खरे आहे आणि जोपर्यंत आम्ही त्यांनी शिकवलेल्या धर्मपथावर चालत राहू, हा संपर्क ह्याचप्रमाणे सतत कायम राहील.

हे पाहून माझे मन आनंदाने व प्रसन्नतेने भरुन जाते की लोक शुद्ध धर्माने लाभान्वित होत आहेत. हे त्यांच्या चांगल्या प्रयत्नांचेच फळ आहे आणि हे सतत वाढतच राहिले पाहिजे. त्यांनी आपल्या गुरुदेवांच्या आज्ञेनुसार काम केले आणि आता आम्हालाही त्याचप्रकारे या कार्याला पुढे न्यायचे आहे. असे तेव्हाच होईल, जेव्हा आम्ही त्यांनी सांगितलेल्या मार्गाचे अनुसरण काहीही जोडल्या-तोडल्याविना करत राहू. असे होईल तेव्हाच आम्ही ख-या अर्थाने पूज्य गुरुजींना आपली श्रद्धांजली अर्पित करू व आपले जीवन कृतार्थ करू.

गुरुदेव नेहमी हेच म्हणायचे की धर्म तुमच्या आचरणात उतरला पाहिजे. जीवनात उतरला तरच धर्म आहे. त्यांच्या जीवनापासून आणि मृत्यूपासून प्रेरणा घेऊन, त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालून , आम्हीही असेच धर्मवान बनावे, ह्यातच सर्वांचे मंगल, कल्याण सामावले आहे.

शुभार्शिवाद

इलायचीदेवी सत्यनारायण गोयन्का



धम्मगिरीच्या फुलझाडांना मैत्री देतांना पूज्य गुरुजी व माताजी

## परम पूज्य गुरुदेवांचा सहायक

मी रामप्रताप यादव, पूज्य गुरुदेवांचा व्यक्तिगत सहायक. आज मी धम्मगिरीत राहातो. गुरुजी निवासात असलेल्या आपल्या कार्यालयात तसेच बसून काम करतो, जसे पूर्वी ते असतांना करत होतो.

आज मैत्री दिवस आहे. मी ह्या सर्वप्रथम निर्मित विपश्यना केंद्राला पाहात आहे. किती भव्य दृश्य आहे. इतके सारे धम्महॉल, इतकी सुंदर हिरवळ, फूल-झाडांनी भरलेला गुरुजी निवासाचा बगिचा, ह्यामागे आपली चमक पसरवणारा भव्य पॅगोडा, इतके सारे अत्याधुनिक सुविधापूर्ण साधक निवास, आचार्य निवास आणि ह्या शिबिरात सामील झालेल्या इतक्या सा-या साधकांचे प्रसन्न चेहेरे पाहून मन प्रसन्नतेने व आनंदाने भरुन जाते. इथल्या भोजनालयात रोज जवळपास हजार अथवा कधी त्यापेक्षाही अधिक लोकांसाठी रुचकर आणि स्वास्थ्यवर्धक भोजन वेळच्या वेळी तयार होते. ह्या वेळी वर्षा ऋतूत येथील हिरव्यागर्द डोंगरावरून पडणारे धबधबे येथील भव्यतेचे अद्भूत दृश्य आहे. ह्या सर्वांना पाहातांना मनात गुरुजींच्या सुरवातीच्या दिवसांची आठवण जागी झाली. त्यांच्या विलक्षण प्रवासाचे दृश्य चलचित्राप्रमाणे डोळ्यांसमोरून सरकत आहे. गुरुजींनी कसे असामान्य श्रद्धा, विश्वास व पुरुषार्थाने अनेक अडचणींना पार करत हा प्रवास केला होता.

मागील जन्मांचा माझ्या पुण्यपारमीमुळेच गुरुदेव भारतात आल्याबरोबर त्यांच्या सेवेत राहाण्याची पुण्यसंधी मला प्राप्त झाली. आज त्या सुरवातीच्या शिबिरांच्या न विसरणाऱ्या आठवणी उफाळून आल्या आहेत.

जून १९६९ मध्ये गुरुदेव भारतात आले. मुंबईत पोहोचताच दुसऱ्या दिवशी आपला छोटा भाऊ श्री श्यामसुंदर याच्यासोबत कालबादेवी रस्त्यावर पाचव्या मजल्यावर असणाऱ्या त्यांच्या कार्यालयात पोहोचले. हिंदीत पत्रव्यवहारासाठी मला बोलावले गेले. ते जवळपास २०० लोकांच्या नाव-पत्त्यांची सूची सोबत घेऊन आले होते. त्या सर्वांना ही सूचना देण्यात आली की सयाजी ऊ बा खिनांनी त्यांना विपश्यना शिकवण्याची परवानगी दिली आहे आणि लवकरच मुंबईत एक दहा दिवसाचे विपश्यना शिबिर होणार आहे. जे कोणी यात सामील होऊ इच्छित असतील अथवा जो कोणी आपल्या भागात शिबिर लावण्याची व्यवस्था करू इच्छित असेल, त्याने त्वरित संपर्क करावा. पत्रव्यवहार प्रारंभ झाला. मुंबई व्यतिरिक्त मद्रास, सारनाथ, कलकत्ता, दिल्ली, ताडेपल्लीगुडम (आंध्र प्रदेश), माधोगंज (उ.प्र.), अजमेर (राजस्थान) इत्यादी अनेक ठिकाणांवरून शिबिराची मागणी येऊ लागली. ३ ते १३ जुलैपर्यंत मुंबईच्या पंचायतवाडी धर्मशाळेत पहिले शिबिर लागले. सभागृह मोठे लांबलचक होते व साधक केवळ १४, परंतु गुरुजींच्या निवासासाठी त्यात कोणतीही योग्य खोली नव्हती. सभागृहाच्या जवळच्या खोलीच्या वर महिलांचा निवास होता. ते वर राहिले असते तर गुरुदेवांना पाय-यांवरून वरखाली यावे-जावे लागले असते. त्यामुळे त्यांनी त्याच लांब सभागृहात कपड्याचा पडदा टाकून त्यामागे आपले निवास स्थान बनवले. पडद्याच्या दुसऱ्या बाजूला धम्मासन ठेवण्यात आले. ज्या दरवाजाने साधक प्रवेश करत त्यानेच गुरुदेवही बाथरुम इत्यादीसाठी बाहेर येणे-जाणे करीत असत.

या तीन मजली चौकोनी इमारतीच्या तळ मजल्यावर एका बाजूला धर्मशाळेचे कार्यालय व मुख्य दार, दुसरीकडे स्वयंपाकघर व त्याच्या बाजूला व्हरांड्यासारखे भोजनालय, चौथीकडे सभागृह व मध्ये मोकळे अंगण होते. पहिल्या मजल्यावर तीन बाजूला पुरुष निवास व रस्त्याच्या बाजूकडे मुख्य दाराच्या वर धम्म-सभागृह. ह्या सभागृहाच्या वर कोणताही मजला नव्हता केवळ टाइल्स असणारे छत होते, म्हणूनच गुरुदेवांनी यात पडदा लावून याला आपले निवास स्थान बनवले. दुसऱ्या मजल्यावरील तिन्हीकडे बनलेल्या खोल्यात महिला निवास होता. तिन्ही मजल्यांच्या एका कोपऱ्यात केवळ दोन-दोन शौचालय, एक वा दोन स्नान-घर आणि एक मोरी होती. लोक आपापल्या पाळीनुसार रांगेत उभे राहून त्यांचा उपयोग करत असत. जेव्हा गुरुजींना शौच इत्यादीसाठी जायचे असेल तेव्हा ते विचारायचे की पाहा एखादे रिकामे आहे काय ? त्यावर सूचना लावायचो की 'गुरुजी येत आहेत, कोणीही आत जाऊ नये', तरीही जेव्हा त्यांना सूचना द्यायला जात असे तेव्हा कोणी ना कोणी आत चालले जायचे. आता गुरुजी उभे राहून वाट पाहात राहायचे अथवा परत आपल्या खोलीत जाऊन बसायचे आणि पुन्हा रिकामे होण्याची वाट पाहात राहायचे. पहिल्या मजल्यावर दुसऱ्या बाजूच्या पाय-यांजवळच्या खोलीत माझा निवास व कार्यालय होते, त्यामुळे कोणी चुकीने वर जाणार नाही यावर माझे लक्ष रहात असे. शिबिर योग्य रितीने सुरू होते.

अचानक शिबिराच्या पाचव्या दिवशी मी आजारी पडलो आणि त्यासोबतच अनेक साधक-साधिकाही. गुरुजी चिंतित झाले की काय बरे झाले असेल? त्यांना शंका आली की भोजनासंबंधी काही अडचण तर नाही. डॉक्टरांना बोलावले गेले, त्यांनी सर्वांना तपासून औषध दिले. मलाही आजाराचे औषध दिले, दुसऱ्या दिवशी मी थोडासा बरा झालो. तेव्हा गुरुजींनी माझ्या कार्यालयात येऊन विचारले की मी एखाद्या प्रकारची साधना तर करत नाही? मी सांगितले की आनंदमार्गाची एक साधना मी रोज सकाळ-संध्याकाळ अर्धा-अर्धा तास नियमित रूपाने करतो. ते म्हणाले 'ओह ! म्हणून तुम्ही ही आजारी पडलात व माझे साधक-साधिकाही. ती बीजमंत्राची साधना आहे व मी तर इथे नैसर्गिक क्रियांना पाहाण्याची साधना शिकवत आहे. एकाच आवारात असल्यामुळे यांचा मेळ होऊ शकत नाही. तुम्हाला हे बंद करावे लागेल अन्यथा इथे राहाता येणार नाही'. मी म्हटले की मी माझ्या घरी जाऊन साधना करीन, परंतु ते सोडू शकत नाही. नेहमीप्रमाणे कार्यालयाच्या वेळेस इथे येईन. तेव्हा त्यांनी प्रेमाने व मैत्रीने दोन्ही साधनांमधील अंतर समजावले. ते म्हणाले की जर त्या साधनेला सोडून ही साधना कराल तर मी जबाबदारी घेतो की तुमची कोणतीही हानी होणार नाही. ह्यापुढेही अनेक शिबिर होणार आहेत, तुम्ही ह्याचे प्रारंभिक पाऊल इथेच शिकाल तर चांगले होईल.

खूप विचार केल्यानंतर मी होकार दिल्यावर ते मला सभागृहात घेऊन गेले आणि विधिवत आनापानाची शिकवण दिली. शिबिराचा अर्ध्यापेक्षा जास्त वेळ संपला होता, त्यामुळे ह्यापेक्षा जास्त काही होऊ शकत नव्हते. मला सांगण्यात आले की केवळ श्वास पाहाण्याचे काम करीत राहा. मी तेच केले व शिबिर शांततेत पूर्ण झाले. सर्व उपद्रव शांत झाले.

ह्या शिबिरात मी कोणतेही प्रवचन ऐकले नाही व पुढची माहिती विचारली नाही. जुनी साधना सोडून आनापान करू लागलो. पुढचे शिबिर २४ ऑगस्ट ते ३ सप्टेंबरपर्यंत मद्रास (चेन्नई) मध्ये लागणार होते. त्याच्या जवळपास १५ दिवसांपूर्वी त्यांच्यासोबत मी पण मद्रासला गेलो. तेथे त्यांचे मोठे भाऊ बालकृष्णजींच्या घरी राहून साधना करतांना अचानक एके दिवशी माझ्या नाकाखाली मुंग्यारांगल्या सारखे जाणवू लागले. मी हात लावून हटवण्याचा प्रयत्न केला पण डोळे बंद करताच पुन्हा रांगू लागत. मला समजत नव्हते की हे काय आहे. कार्यालयात गुरुजींकडून डिक्टेशन घेतल्यानंतर मी त्यांना ह्या बाबतीत विचारले तेव्हा ते म्हणाले की याला महत्व देऊ नका. केवळ श्वास पाहात राहा. जेव्हा दहा दिवसाच्या शिबिरात बसाल तेव्हा ह्याबाबत सांगीन.

आता २४ ऑगस्टच्या शिबिरात मी पण सामील झालो. आवश्यक पत्रव्यवहार तरीही सुरू राहीला. जेव्हा वेळ असेल तेव्हा जाऊन डिक्टेशन घ्यायचो, रात्री उशीरापर्यंत टाईप करायचो व साधनेच्या वेळी साधना करायचो. दीर्घकाळापर्यंत आनापान करीत राहाण्याचा फायदा झाला. विपश्यना मिळाल्याबरोबर सर्व शरीरात संवेदनांची अनुभूती होऊ लागली, परंतु जुन्या साधनेमुळे अडचणीही खूप आल्या. गुरुदेवांनी रंगून येथील आपल्या मोठ्या भावाला श्री बाबूलालजींना ह्या सर्व घटनांबाबत विस्ताराने पत्र लिहिले आणि गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांना हे सांगण्यास सांगितले. त्यांच्याकडून मंगल मैत्री मिळाली आणि सर्व वादळ शांत झाले. मनात विचार येतो की किती भाग्यशाली आहे मी.

त्या काळात धर्मशाळेत भरणाऱ्या सर्वच शिबिरात अनेक प्रकारच्या अडचणी येत असत. सर्व ठिकाणी गूरुजींना खूप कष्ट सहन करावे लागत असत. परंतु त्यांच्या कपाळावर कधीही आठ्या आल्या नाहीत. ते म्हणायचे ही अपेक्षा घेऊनच आलो आहे, त्यामुळे यात वाईट वाटण्याचे काही कारण नाही. सर्व साधकही तर अशाच कष्टातून जातात.

असेच एक शिबिर गुजरातच्या अहमदाबाद जवळील सादरा नावाच्या गावात लावले गेले. तेथे साधकांनी स्वतःच मिळून दगडी चुलीवर भोजन इत्यादी बनवण्यापासून शिबिराचा सारा कार्यभार सांभाळला. साधने दरम्यात चेकिंग (तपासणी) झाल्यानंतर काही साधक-साधिका मिळून स्वयंपाकाचे काम करू लागत. भोजनानंतर महिला साफसफाईही करीत असत. गुरुजीनी मला अगोदरच सांगून ठेवले होते की हे गरीब घरातील लोकांचे शिबिर आहे, कोणत्याही गोष्टीची मागणी करू नये. जे मिळेल ते घेऊन या. आपल्याकडून काही मागू नये. तेथे पहिल्या दिवशी गुरुजींचे ताट लावायला गेलो, तर एक भाजी, वरण, कोरड्या अर्ध्या जळालेल्या पोळ्या, कांद्याचे काही तुकडे व ताक घेऊन आलो. गुरुजींनी खाण्यापूर्वी पुन्हा विचारले की काही मागितले तर नाही ना? मी म्हटले, 'नाही, त्या लोकांनी विचारले तर

खूप परंतु मी सांगितले काही नाही.' भोजनानंतर ते लोक गुरुजींना म्हणाले, 'गुरुजी आमचे भोजन आपल्या अनुकूल नाही, परंतु ह्यापेक्षा जास्त आम्ही येथे काही करूही शकत नाही. कृपया क्षमा करावी. हे ठिकाण शहरापासून खूप दूर आहे.' गुरुजींनी हसत म्हटले, भोजन खूप स्वादिष्ट होते, कारण तुमची मैत्री त्यासोबत होती. तुम्ही आपली साधना करत राहा. मला येथे काहीही त्रास नाही. त्या शिबिरात भाग घेणाऱ्यांपैकी काही लोक आज विपश्यनाचार्य आहेत व धम्मासनावर बसून अनेकांच्या कल्याणात सहायक झाले आहेत.

त्याच दिवसांत अजमेरजवळ पुष्करमध्ये एक शिबिर लागले. व्यवस्थापकाने तर खूप मनोवेधक भाषेत पत्रव्यवहार करून लोकांना आमंत्रित केले. गुरुदेवांनीही त्याच्या पत्राची भाषा व हस्ताक्षर पाहून शिबिराची स्वीकृती दिली होती. शिबिर तो अजमेरमध्येच लावणार होता परंतु तेथे कोणतेही स्थान उपलब्ध झाले नाही. धर्मशाळा तर तिथेही आहेत परंतु लोकांनी खोटे कारण सांगितले कारण त्यांना वाटले की हे बौद्धांचे शिबिर आहे. शेवटी नाईलाजाने त्याने जवळच्या पुष्कर या तिर्थस्थानी एक धर्मशाळा निश्चित केली. त्या वेळी कोणताही सण-उत्सव नव्हता, त्यामुळे ती रिकामी होती. परंतु ऐन वेळी अजमेर व जवळपासचा कोणीही त्या शिबिरात बसला नाही.

गुरुदेव त्या दिवसांत ३-टिअर स्लीपर म्हणजे आजच्या स्लीपर क्लासमध्येच यात्रा करायचे. तेव्हा मी व गुरुदेव सोबतच रेल्वेने जायचो. रेल्वेत समोरच्या सीटवर एक साधू (संन्यासी) बसला होता, त्याचे अमूक एका ठिकाणी जायचे असे काही ठरलेले नव्हते, कुठेही उतरू शकत होता. ध्यान चर्चा सुरू झाली तर त्यानेही शिबिरात बसण्याची इच्छा प्रकट केली. गुरुदेव म्हणाले माझ्यासोबत पुष्करला चला. तेथे उद्याच शिबिर लागणार आहे. आम्ही तिघेही स्टेशनवर उतरलो व तेथून व्यवस्थापकासोबत सरळ पुष्करला पोहोचलो. तिथे पाहिले की कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही. त्या 'यादव धर्मशाळेत' एकही स्नानघर व शौचालय नाही. शिबिर व्यवस्थापकाने धर्मशाळेबाहेर जवळच्या कोरड्या नाल्याच्या बांधावर गवताची चटई लावून ३-४ फुटाचा केबीनसारखा घेराव तयार केला होता. नाल्याच्या काठावर बसून शौचक्रिया करायची जी सरळ कोरड्या नाल्यात ५-६ फुट खाली पडेल, जिथे पाळीव प्राणी येत-जात असत. स्नानासाठी धर्मशाळेच्या अंगणात एका कोपऱ्यात चटई लावण्यात आली. वरच्या मजल्यावर कोणीही नव्हते. पहारेकरी विहिरीवरून पाणी आणून देईल. इथेच स्नान करावे. केवळ एकच पहारेकरी होता, ज्याने भोजन बनवण्याचीही जबाबदारी घेतली होती. तोच साफ-सफाईही करायचा. गुरुदेवांनी म्हटले की येथे स्नान करण्यापेक्षा बाहेर विहिरीच्या ओट्यावरच स्नान करू. तेथे केवळ पाणीच काढावे लागेल, इथपर्यंत आणायचे काम तर वाचेल. त्यांनी एका दिवसानंतर त्या नवनिर्मित शौचालयाचाही उपयोग बंद केला. एका लोट्यात पाणी घेऊन गाववाल्यांप्रमाणे तेही बाहेर उघड्यावरच शौचासाठी जाऊ लागले.

रस्त्यात भेटलेला तो संन्यासी व एकटा व्यवस्थापक, दोघेच शिबिरात बसणारे होते. गुरुजी म्हणाले, 'ठीक आहे. यादव चला आपण दोघेही शिबिरात बसू.' ह्याप्रकारे आम्ही चौघेही शिबिरात बसलो. तेथे गावात न कोणतेही पत्र वेळेवर पोहोचायचे न फोनची सोय होती. त्यामुळे आम्ही शांतीपूर्वक साधना करू शकलो. गुरुदेव साधनाही करत राहिले व तेथे प्रवचनही तसेच देत राहिले जसे इतर शिबिरात द्यायचे. व्यवस्थापकाने यापूर्वी विपश्यनेचे कोणतेही शिबिर केले नव्हते, परंतु तरीही तो केवळ सात दिवसच शिबिरात राहू शकला. त्याने असे सांगितले की श्रीलंकेत त्याला काही आवश्यक मिटिंगसाठी जायचे आहे. त्यामुळे सातव्या दिवशी तोही निघून गेला. आता राहिलो आम्ही तिघे, जे व्यवस्थेपासून ते सर्व काहीचे सर्वेसर्वा होतो. होय, पहारेकरी वेळेवर जेवण बनवून अवश्य द्यायचा, जसा तो आपल्यासाठी बनवायचा. शिबिर पूर्ण झाले व चांगले झाले. संन्यासी तर धन्य झाला. शिबिराच्या शेवटी कृतज्ञताविभोर होऊन म्हणाला की हिमालयात राहून मागील १२ वर्षांचे माझे संन्याशाचे जीवन व्यर्थ गेले. आज मी खऱ्या अर्थाने संन्यासी म्हणवण्याच्या लायक झालो आहे.

पूज्य माताजी ब्रह्मदेशातून एका वर्षानंतर आल्या. त्या आल्यानंतर काही दिवस परिवार व मुलांसोबत राहिल्या आणि नंतर त्याही धर्मकार्यात सहकार्य करू लागल्या. त्यांनी परिवार व मुलांची मोह-माया त्यागून विपश्यनेच्या प्रचार-प्रसारातच आपला सर्व वेळ लावला. मुले हळूहळू शिकत-वाढत राहिली आणि काम-धंद्यात लागत राहिली. गुरुदेव जेव्हा शिबिर संपवून परतायचे तेव्हा त्यांना जसे शक्य होईल तसे व्यापार-धंद्याची खुबी शिकवायचे व आपल्या व्यापारी जीवनापासून ते धर्मसेवेपर्यंतचे अनुभव सांगायचे आणि हेही समजवायचे की धर्मसेवेचे लाभ काय आहेत व महत्व काय आहे.

हे शेवटपर्यंत चालत राहिले. तीच अतुलनीय श्रद्धा, तोच असीम पुरुषार्थ, तीच अप्रतिम निष्ठा आपले गुरुदेव सयाजी ऊ बा खिनांच्या प्रती आणि त्यांच्याद्वारे प्रशिक्षित सद्धर्माच्या प्रती. आपल्या गुरुदेवांना दिलेल्या वचनाला त्यांनी मृत्यूपर्यंत निभावले.

मी असा विचार केला की त्यांच्या जीवनातील प्रसंगांच्या काही आठवणी आपल्या सर्वांसोबत वाटू. परंतु किती सांगू, कितीही लिहू, कमीच आहे. ह्या अमूल्य आठवणीच आता जीवनभर सोबत आहेत आणि धर्मपथावर चालण्यासाठी प्रेरणास्त्रोत आहेत.

धन्य धन्य गुरुदेवजी ! ...

सविनय,

रामप्रताप यादव

## शेवटपर्यंत सतत कर्मशील गुरुदेव

श्री यादवजींनी जसे परम पूज्य गुरुदेवांच्या भारतातील विपश्यनेच्या प्रारंभिक दिवसांच्या आठवणीत सर्वांना सहभागी केले, त्याचप्रकारे मी त्या महापुरुषाच्या शेवटच्या दिवसांच्या आठवणीत सर्वांना सहभागी करू इच्छितो.

मी सन १९९० पासून २०१३ पर्यंत पूज्य गुरुजींचे धर्मसाहित्य सृजन, विशेषकरून त्यांचे बर्मामध्ये लिहिलेले जुने लेख, कविता, धर्मपत्र इत्यादींचे लेखन, संकलन, संशोधन व लेखन करण्यात त्यांचा धर्मसहायक राहिलो आहे. हिंदी भाषेचा शीघ्र लेखक असल्यामुळे पूज्य गुरुजींजवळ बसून त्यांच्या नवीन लेखांसाठी श्रुतिलेख (डिक्टेशन) घेत राहिलो.

सन २०११ मध्ये श्री यादवजीच्या आजारपणामुळे पूज्य गुरुजींनी आपल्या उर्वरित साहित्याच्या निर्माण कार्यासाठी मला आपल्या मुंबईच्या निवास-स्थानी बोलावले व धर्म-सेवा करण्याचा आदेश दिला. तेथे आपल्या निवासाजवळच माझी धर्मपत्नी आनंदी देवीच्या सोबत राहाण्यासाठी एक छोटा फ्लॅटही अंधेरीत मिळवून दिला, ज्यामुळे मी रोज १० वाजेपासून ४-५ वाजेपर्यंत त्यांच्या घरी येऊन त्यांच्या निर्देशानुसार धर्मसंबंधी लेखनकार्याचे संकलन करू शकीन. ह्यादरम्यान 'coffee table book', 'Vipassana Centres book', 'माझ्या कविता' यासारख्या महत्वपूर्ण पुस्तकांचे प्रकाशन झाले. 'मंगल हुआ प्रभात' पुस्तकात जवळपास १००० नवे दोहे जोडले गेले. ह्यांचे संकलन केले गेले व अनेक नवे दोहे जे त्यांच्या दैनंदिनीमधून टाईप केले होते, त्यांना त्यांनी लक्षपूर्वक पाहिले व अनेकांना रद्द करण्याचे निर्देश दिले. ह्या सर्वांच्या प्रकाशनात गुरुदेवांचे अमूल्य उपयोगी मार्गदर्शन मिळाले.

त्यांच्या शारीरिक आजारांमुळे त्यांचा पुष्कळसा वेळ दैनिक उपचार विधित निघून जायचा. त्यानंतर जेवढा वेळ त्यांना मिळायचा, त्यापैकी एकही क्षण ते वाया जाऊ देत नव्हते. ताबडतोब धर्मकार्य करू लागायचे.

नेहमी असे आढळते की अशा शारीरिक आजारांमुळे व वाढत्या वयामुळेही मनावर परिणाम होतो. व्यक्ती निराश व हताश होऊन कोणतेही काम करू इच्छित नाही. परंतु गुरुजी कोणी साधारण मनुष्य नव्हते. ते विपश्यनेचे सक्षम साधकच नव्हते, तर महान विपश्यनाचार्य होते. त्यांच्या धर्मचेतनेचे काय सांगावे ! एखाद्या सामान्य मनुष्यत्वाची सीमा त्यांनी निश्चितच ओलांडली होती. मी ठामपणे सांगू शकतो की पूज्य गुरुजींच्या मानसिक स्वास्थ्यात व निर्णयात्मक बुद्धीत कधीही कोणताही अडथळा, खंड आला नाही. शारीरिक आजारामुळे कधी काही

काळापुरती अशक्तता आली असेल परंतु त्यांची प्रांजळ बुद्धी कधीही मंद झाली नाही.

मी आपल्या स्वतःला अत्यंत सौभाग्यशाली मानतो की मला त्यांच्या सेवेची संधी प्राप्त झाली. त्यांचे अंतिम दिवस माझ्यासाठी असीम



प्रारंभापासून अंतापर्यंत सतत कार्यरत - श्री रामेश्वरजींना निर्देश देतांना

प्रेरणेचे स्त्रोत बनले. मला जाणीव झाली आहे धर्माच्या, विपश्यनेच्या त्या ताकतीची जी ह्या भौतिक जगाच्या मानलेल्या सीमांच्या खूप पलिकडे आहे.

मी मानतो की आम्ही सर्व ज्यांनी त्यांच्याकडून विपश्यना विधीचे ज्ञान अर्जित केले, धर्माने ज्यांना द्वितीय शासन स्थापित करण्यासाठी निवडले, त्या आम्ही सर्वांनी या महान विभूतीचे खऱ्या अर्थाने शिष्य बनावे.

जगातील जवळपास सर्व प्रमुख देशात विपश्यना साधना शिकण्याची केंद्र स्थापित आहेत. ह्या सर्व केंद्रांची स्थापना विपश्यनेचे प्रमुख आचार्य पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयन्काजींच्या निर्देशानुसार झाली आहे. सर्व देशांच्या केंद्रांसाठी पूज्य गुरुजींद्वारे एकसमान, एकसारखे नियम-निर्देश, अनुशासन, वेळापत्रक बनवण्यात आलेले आहे व त्यानुसारच सर्व विपश्यना शिबिरांचे संचालन होते.

विपश्यना साधना दीर्घकाळापर्यंत शुद्ध व अभंग राहावी, मानवतेचे कल्याण करत राहावी, लोक-मंगल होत राहावे, ह्या लक्ष्याला समोर ठेऊनच पूज्य गुरुजींनी सर्व देशांच्या केंद्रांसाठी समान रूपाने एकसारखे नियम-उपनियम बनवले. सर्व केंद्रांच्या सुव्यवस्थेसाठी प्रबंधक व विपश्यना साधना शिकवणाऱ्यांची निवड करण्यासाठी एकसारखी सुव्यवस्था स्थापन केली.

आशा आहे की गुरुजींच्या विपुल मार्गदर्शनाच्या आधारावर ही सर्वकल्याणकारी विपश्यना साधना आपल्या शुद्ध स्वरूपात अनेक शतकापर्यंत कायम राहील व अनेकांचे कल्याण करत राहील.

पूज्य गुरुजी म्हणायचे की हे पाहाणे आमचे कर्तव्य आहे की कशा प्रकारे ही अनमोल विद्या पुढील २५०० वर्षांपर्यंत सुरक्षित राहील. ह्या परंपरेची खूप मोठी जबाबदारी आचार्यांच्या खांद्यांवर आहे. पूज्य गुरुजी आपले कार्य खूप निष्ठेने व निपुणतेने पार पाडून गेले. आम्ही सर्वांनी ह्या कार्याला उत्तम प्रकारे पार पाडावे व हा अनमोल ठेवा पुढच्या पिढीच्या हातात सुरक्षित सोपवावा. हीच आमची पूज्य गुरुदेवांना खरी श्रद्धांजली असेल.

विनम्र, रामेश्वरलाल शर्मा,
पूज्य गुरुजींचा धर्म-सहायक

## धम्मदीप विपश्यना केंद्रात सहायक आचार्य संमेलन

*(यू.के. विपश्यना संघ, ३०-४-२०१४)*

यू.के. विपश्यना ट्रस्टद्वारे आयोजित ह्या सहायक आचार्य संमेलनात सामील होणाऱ्या श्री गोयन्काजींच्या सर्व सहायकांचे व ह्या आठवड्यात सेवा देण्यासाठी इच्छुक धर्मसेवकांचे हार्दिक स्वागत आहे. विश्वास आहे की आपल्या सर्वांचा प्रवास सुखद झाला असेल व हे संमेलन सर्वांसाठी स्फूर्तिदायक आणि प्रेरणादायक ठरो.

कालपासून ठीक सात महिन्याअगोदर आमचे परम प्रिय धर्मपिता व धर्मपथ प्रदर्शक श्री गोयन्काजींनी आपल्या शरीराचा त्याग केला. त्यानंतर ही आमची प्रथम धर्मसभा आयोजित झाली आहे. त्यांनी आम्हाला जी धर्मशक्ती दिली त्याचेच हे फळ आहे की आज धर्माचे चक्र संपूर्ण विश्वात चारही दिशांना जोरात फिरत आहे. येथे धम्मदीपमध्ये साधकांची वाढती संख्या व धर्माप्रती लोकांच्या आस्थेचे अनुमान ह्यामुळे लावले जाऊ शकते की धम्मदीपच्या शिबिराची नोंदणी सुरू होताच शिबिराच्या जागा काही तासातच संपूर्ण भरतात. इथल्या नोंदणी करणाऱ्यांचे म्हणणे आहे की जेव्हा कोणी आपल्या कामावरून परत येऊन संगणक उघडतो, तेव्हा पाहातो की शिबिराच्या जागांची नोंदणी पूर्ण झाली आहे. तसेच नोंदणीसाठी इच्छुक अशा अनेक लोकांची नावे प्रतिक्षा सूचीत आलेली आहेत.

आम्ही पाहिले की ज्या साधकांना श्री गोयन्काजींच्या निधनाबाबत आत्ता माहिती झाली, ते आमच्याजवळ हे विचारण्यासाठी येतात की आमची त्यांच्याशी भेट झाली होती काय ? आम्ही हो म्हटल्यावर ते विचारतात की ते तसेच होते काय जसे व्हिडिओत दिसतात ? आम्ही म्हणतो, होय, ते अगदी तसेच होते.

नवीन पिढीचे लोक जे आता त्यांच्या निधनानंतर आपले प्रथम शिबिर करण्यासाठी येत आहेत अथवा ते जे अजून जन्माला यायचे आहेत, त्या सर्वांपर्यंत ही अनमोल विद्या आम्हाला ह्याच शुद्ध रूपात पोहोचवायची आहे. हेच आमचे पावन ध्येय आहे व ह्या धर्मसभेचा हाच पावन संदेश आहे. आज श्री गोयन्काजी एक इतिहास बनले आहेत, परंतु त्यांनी तर खरोखर इतिहास रचला आहे. आजची समाचारपत्रे राजनेत्यांच्या हालचाली, भांडणे, दुर्घटना इत्यादींसारख्या निराशाजनक बातम्यांनीच भरलेली असतात. अशा वेळेस मानवांना खऱ्या धर्मसुखाचा रस्ता दाखवणारा महामानवही बातम्यांमध्ये हरवून गेला. असा धर्म जो आपल्या उगम स्थानापासून पूर्णपणे लुप्त झाला होता, त्याला त्यांनी न केवळ इथे पुनर्स्थापित केले तर संपूर्ण विश्वात पसरवले. ही त्यांची मोठी कार्यसिद्धी, अद्‌भूत कौशल्य व समर्पणभावाने केलेले काम खरोखर भगवानांच्या दुसऱ्या शासनाच्या प्रारंभाच्या प्रमुख भूमिकेला दर्शवते. आम्हाला याला निष्ठापूर्वक पुढे न्यायचे आहे व ह्या जबाबदारीला दृढतापूर्वक पार पाडायचे आहे.

ते त्यांच्या जीवनकाळात आम्हाला सतत सावध करीत असत की धर्माचे जीवन जगणेच धर्माला पुढे नेणे आहे. आता ही जबाबदारी पूर्वीपेक्षा अनेक पटीने वाढलेली आहे. ही गती, ही शुद्धता व ह्या विद्येच्या फलोत्पादकतेला कायम ठेवावेच लागेल. श्री गोयन्काजींच्या शिवाय ह्या आव्हानात्मक कार्याची आम्हाला भिती वाटू शकते पण आम्ही एकटे कुठे आहोत ? आम्ही सर्व धम्मसाथी त्यांच्या छत्रछायेत पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित आहोत. जे गहन विलक्षण ज्ञान व अनुशासन आम्हाला त्यांच्याकडून प्राप्त झाले आहे, ते नेहमी आमचे रक्षण करीत राहील. जेव्हा आम्ही धम्मासनावर बसतो, आम्हाला ही जाणीव होते की हे शिबिर आम्ही नाही तर स्वतः गोयन्काजी संचालित करीत आहेत. आज शरीराने ते आमच्यात नसले तरी आम्हाला असेच प्रतीत होते. आम्ही त्यांच्या हातातील साधनांप्रमाणे काम करत आहोत व धर्माचे केवळ सेवक आहोत आपल्या 'मी' चे पोषक नाही. ज्या प्रकारे श्री गोयन्काजींनी आपल्या पूर्वीच्या सर्व गुरुंप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे, त्याच प्रकारे त्यांच्याप्रती कृतज्ञता प्रकट करण्याचा हाच एकमात्र उपाय आहे की आम्ही त्यांच्या सांगितलेल्या मार्गावर स्वतः चालू व इतर सर्वांनाही त्यावर चालण्यासाठी प्रेरित करीत राहू.

आपल्या एका प्रवचनात त्यांनी एका छोट्याशा पिल्लाची गोष्ट सांगितली होती - एक पिल्लू एका बैलगाडीच्या खाली चालत होते. चालतांना त्याच्या मनात असा भाव आला की त्या संपूर्ण बैलगाडीचा भार तो स्वतः वर घेऊन चालत आहे, ह्या उलट तो तिच्या सावलीत चालत होता. असेच आम्हीही आपल्या जबाबदारीची जाणीव ठेऊन त्यांच्या सावलीत चालत राहिलो तर आमच्यावर कोणतेही ओझे राहाणार नाही. खरे म्हणजे हे कार्य आमच्यावर अवलंबून नाही, तर विपश्यनेची वेळ आलेली आहे, तिचा डंका वाजला आहे. आम्ही तर खूप भाग्यवान आहोत की ह्या धर्मकार्यात माध्यम बनलो. अशा धर्मगुरुंच्या प्रत्यक्ष संपर्कामुळे आमचाही खरोखर गौरव झाला आहे. ह्या गौरवाला कायम ठेवावे, ह्यातच सर्वांचे मंगल आहे.

## धर्म प्रसाराची जबाबदारी

*(हे पत्र पूज्य गुरुदेवांनी भारतात येऊन स्थायिक झालेल्या विपश्यी लहान भावांना व त्यांच्या धर्मपत्नींना लिहिले, ज्यात त्यांनी धर्मचर्चा करतांना बुद्धशासन सेवेसंबंधी आपला दृढ निश्चय व सद्धर्मात असलेल्या आपल्या पुष्टतेचा परिचय दिला आहे. जरी त्या वेळी ते विपश्यनाचार्य नियुक्त झाले नव्हते परंतु धर्मप्रसारणासाठी निश्चितच त्यांचा दृढ निश्चय झाला होता. जसे...)*

दि.२९-१२-६८

प्रिय शंकर, (राधे, सीता, विमला !)

सप्रेम आशिर्वाद.

मागील दोन आठवडे खूपच अधिक व्यस्त राहिल्यानंतर आज जरा सवड मिळाली आहे. मला वाटते की पुढील एक आठवडाभर अजून व्यस्त राहीन व त्यानंतर मोकळा होईन. खरोखर तिन्ही उद्योगांचे राष्ट्रीयकरण करून सरकारने माझ्यावर कृपाच केली आहे. जे काही झाले ते निश्चितच माझ्या भल्यासाठी झाले आहे. आता मी आपल्या भविष्याबाबत विचार करतो तेव्हा मन प्रसन्नतेने भरते व शरीरावर रोमांच उभे होतात.

ब्रह्मदेशात राहून मला पुष्कळशा जबाबदाऱ्या पूर्ण करायच्या आहेत. आता त्या सर्वांसाठी पुरेसा वेळ मिळाला आहे. उद्योग-धंद्याचा भार डोक्यावर असतांना मी ह्याकडे कधीही लक्ष देऊ शकलो नसतो. ह्या पुण्यभूमीवर राहातांना मी सद्धर्माच्या अमृताचा जो रस चाखला आहे व सद्धर्माच्या सखोलतेची जी थोडा-फार ओळख झाली आहे, त्यामुळे मनात एक अशी भूक जागली आहे जी काही वर्ष ह्याच देशात राहून पूर्ण केली जाऊ शकते.

जोवर पटिपत्ती धर्म, म्हणजे सक्रिय साधनेचा प्रश्न आहे, मला अधिक गंभीरतेने सखोल अभ्यास करण्यासाठी सवड मिळाली आहे. मी याचा पूर्णपणे लाभ घेईन. त्याचप्रकारे परियत्ती, म्हणजे धर्मशास्त्राच्या क्षेत्रातही धर्मसाहित्याचा किती मोठा विशाल संग्रह माझ्यासमोर आहे. ब्रह्मदेशाबाहेर, विशेषतः भारतात तर फार प्रयत्नानंतर केवळ त्रिपिटकच प्रकाशित होऊ शकले, तेही केवळ मूळ पालीत, त्याचे भाषांतर नाही. त्याउलट येथे त्या त्रिपिटकापेक्षा कितीतरी पट मोठे साहित्य-त्रिपिटकाच्या अर्थ कथा, टीका व अनुटीकेच्या रूपात प्रसिद्ध झाले आहे व त्याच्या मूळभूमीत, भारतात परतण्याची वाट पाहात आहे. ह्या विशाल साहित्याचा कोण उद्धार करेल बरे? कोण याला भारतात पोहोचवेल ? मी असे समजतो की ह्या क्षेत्रात माझ्या डोक्यावर धर्मशासनाची जी खूप मोठी जबाबदारी येणार होती त्यामुळेच ह्या औद्योगिक जबाबदारीतून मला सुट्टी मिळाली.

बुद्धांच्या शिकवणुकीच्या नावावर भारतात जे साहित्य लिहिले गेले आहे ते काही ठिकाणी भ्रामकही आहे, गोधंळ निर्माण करणारे आहे. ह्या सर्वांचे मुख्य कारण हेच आहे की अर्थ कथा, टीका व अनुटीकेसहित संपूर्ण त्रिपिटकाचे आतापर्यंत भारताच्या विद्वानांनी दर्शनही केले नाही, अध्ययन करणे तर खूप दूरची गोष्ट आहे. ह्याव्यतिरिक्त धर्माच्या व्यावहारिक अभ्यासाशिवाय भगवानांची वाणी समजणे कठिण आहे व त्यामुळे तिच्यात अनेक प्रकारे काट-छाट करण्याचा प्रयत्न केला जातो. जर सर्व धर्मसाहित्य प्रकाशात आले तर ही जोडण्या-तोडण्याची वृत्ती आपोआपच बंद होईल.

भगवानांच्या धर्मसिद्धांतांना कोणी मानो अथवा न मानो, ही वेगळी बाब आहे, परंतु त्यांच्या निर्देशांवर, विचारधारेवर, त्यांच्या धर्मदर्शनावर आपल्या मतांचे आरोपण करणे खूपच मोठा अन्याय आहे. हा अन्याय तेव्हापर्यंत होत राहील जोपर्यंत धर्मवाणी संपूर्ण रूपात लोकांच्या समोर येणार नाही. ह्याचप्रकारे ज्यांनी पाली त्रिपिटक वाचले आहे, तेही पुष्कळश्या दिशाभूल करणाऱ्या गोष्टी करतात, कारण ते सद्धर्माच्या साधनेच्या पक्षात एकदम कोरे आहेत. ह्या क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे त्रिपिटकात लिहिलेल्या पुष्कळशा बाबी समजत नाहीत व त्यामुळे त्या बाबी योग्यप्रकारे मांडल्या जाऊ शकत नाहीत. ह्या दोन्ही बाबींना पाहून मी समजतो की माझ्या डोक्यावर बुद्धशासनाची एक खूप मोठी जबाबदारी आलेली आहे व हिला मला धैर्य व चिकाटीने पार पाडायचे आहे. हे काम ह्याच देशात पूर्ण होऊ शकेल, कारण ह्या कार्यासाठी जी साधने येथे उपलब्ध आहेत ती इतर ठिकाणी नाहीत. विशेषतः अभिधम्माची माहिति तर जगातील कोणत्याही भागात अशी नाही, जशी इथे आहे.

उद्योगाची जबाबदारी शासनाच्या अधिकाऱ्यांना पूर्णपणे सोपवून मी काही दिवसांसाठी ध्यान साधनेला बसेन व त्यानंतर धर्मशासनाच्या कामात लागेन, अशी इच्छा आहे.

५-७ दिवसांपूर्वी तुमचे एक पत्र आले होते, ते वाचून ह्या बाबीचा खूप आनंद झाला की तुमची धर्मबुद्धी परिपक्व आहे व ह्या उद्योगांचे राष्ट्रीयकरण केल्यामुळे तुमच्या मनात व्याकुळता नाही. येथे माझेही ही मन किंचितही क्षुब्ध झाले नाही, उलट मागील १५ दिवसात ज्या चमत्कारपूर्ण अनुभूती आल्या, त्यामुळे मन सद्धर्माबद्यल अजून अधिक श्रध्दावान झाले. व्यावसायिक राष्ट्रीयकरण व अर्थ अवमूल्यनाच्या वेळी धर्माने कशा रितीने छत्रीप्रमाणे पसरून आम्हा सर्वांचे रक्षण केले होते, जवळपास त्याच गोष्टींची पुनरावृत्ती झाली. मन खूप दृढ झाले की - **ठठधम्मो हवे रक्खति धम्मचारिंठठ**. म्हणजे धर्मविहारीचा सदा, धर्म राहे रक्षक.

तुम्ही आपल्या पत्रात लिहिले होते की मी बुद्ध शासनाच्या सेवेसाठी भारतात यावे, जिथे सद्धर्माची खूप मोठी भूक आहे व खूप मोठी आवश्यकताही आहे. मीपण याला आपल्या जीवनाची एक महत्वपूर्ण जबाबदारी मानतो, परंतु असे वाटते की ती वेळ अजून आली नाही. सध्या ह्या ढगांना अजून पाणी भरून घेऊ द्या. ह्या धर्मसागराच्या जलराशीने हे ढग पूर्णपणे तृप्त होतील तेव्हा निश्चितच भारत भूमीवर सद्धर्माची धाराप्रवाह वर्षा करण्यासाठी येतील व इतकी वर्षा होईल की तेथील सारे दुःख-दैन्य दूर होईल. ह्यासाठी योग्य वेळेची प्रतिक्षा करावी लागेल आणि तोपर्यंत आम्हाला ह्या ढगांना धर्माच्या जलराशीने भरत राहावे लागेल.

बाबू भैयालाही ही योजना खूप आवडली आहे व आम्ही दोघे ह्या कामाची सुरवात लवकरच करू. होय, बनवारीला उद्योगाच्या जबाबदारीतून वेगळे झाल्यावर कोणत्या ना कोणत्या कामास लावावे लागेल. सध्या जे काम आम्हाला त्याच्यासाठी दिसते ते हे आहे की त्याने आमच्या देखरेखीत कृषी व गोपालनाच्या धंद्यात लागावे. जर कोणी समजदारीने काम करेल व श्रम करायची तयारी ठेवेल तर आपल्याजवळ जे गोधन व उत्पादक भूमी आहे, तिच्या साह्याने संपूर्ण परिवाराचे पालन-पोषण केले जाऊ शकते. तो ह्या कामात लागला तर त्याच्याविषयीची माझी चिंता दूर होईल.

आजपासून जवळपास वीस वर्षापूर्वी जेव्हा तुमचा विवाह झाला होता, त्यावेळी मी एक आशीर्वादात्मक कविता लिहिली होती ज्याचे एक पद होते -

**ज्या भूमीवर जन्मले, ज्या मातीवर खेळले।**
**त्या स्वर्णधरेने जरी, सर्वस्व तुमचे घेतले।।**

**ह्या जन्मधरे प्रती तुम्ही, कर्तव्य आपले निभवा।**
**ही स्वर्गापेक्षा सुखमय, ना तुम्ही हिला लाजवा।।**

तुमचे पत्र येताच एकदम हे पद आठवले व ह्या बाबीसाठी मन

प्रसन्न झाले की आपल्या मातृभूमीला सर्वस्व अर्पण करण्यात तुमचे मन प्रसन्न झाले, क्लांत नाही. येथेही बाबूभैयाने ज्या अनासक्त भावाने जीवनाच्या ह्या महत्वपूर्ण घटनेला सहन केले व जीवनाच्या नवीन वळणासाठी आपल्या स्वतःला तयार केले, ते अत्यंत प्रशंसनीय आहे. तेथेही परिवाराच्या सर्व सदस्यांनी ह्या प्रकारच्या उलट-सुलटास धर्मबुद्धीने पाहावे. हातून सुटलेल्या संपत्तीसाठी मनात आसक्ती ठेऊन स्वतःसाठी व्यथेचे कारण बनू नये. सर्वांनी खालील तीन बाबींपासून वाचावे -

१) मनाला कोणत्याही प्रकारचे दुःख होऊ नये - असे समजून की जी वस्तू नष्ट होण्यासाठीच बनली होती, तिच्या नष्ट होण्याचे दुःख कशाला ? जी वस्तू हातून सुटण्यासाठी आली होती, तिच्या सुटण्याने मानसिक वेदना का ?

२) मनात कोणाच्याही विषयी किंचितही क्रोधाचा भाव येऊ नये. ज्यांच्यामुळे आमची धन-संपत्ती गेली, ते बिचारे क्रोधाचे नाहीत तर दयेचे पात्र आहेत. ते तर केवळ निमित्तमात्र आहेत. जर ते निमित्त बनले नसते तर कोणी दुसरा निमित्त बनला असता, ज्याच्यामुळे ही धन-संपत्ती आपल्या हातून निघून गेली असती. व्यापारातही हानी होऊ शकली असती. अग्नीने, पाण्याने, भूकंपाने अथवा अन्य प्राकृतिक कारणांनेही हानी होऊ शकली असती. तेव्हा त्या अवस्थेत आम्ही कोणाला दोष दिला असता ? कोणावर क्रोध केला असता? त्यामुळे जे काही झाले त्यालाच आपल्या कर्माचे फळ समजून शांतीपूर्वक व धैर्यपूर्वक सहन करण्यातच धर्माचा विजय आहे. कोणावरही क्रोध प्रकट करून आम्ही आपल्या चित्ताद्वारे अकुशल वृत्तींना निर्माण करून आपलीच हानी करू, अन्य कोणाची नाही.

३) मनात किंचितही भीतीची भावना येऊ देऊ नये. आता काय होईल ? उद्या कसा जाईल? ह्या चिंतेत चित्ताला विचलित करणे धर्मापासून विचलित होणे आहे. आम्हाला आपल्या कुशल कर्मांवर दृढ विश्वास असला पाहिजे. आम्हाला समजले पाहिजे की जे काही होत आहे ते आमच्या भल्यासाठीच होत आहे. जर कोणत्याही प्रकारचे आर्थिक कष्ट सहन करावे लागले तर तेही भल्यासाठीच आहेत, कारण अनंत जन्मात अनेक अशी अकुशल कर्म केली आहेत, जी अजूनही विपश्यनेच्या अग्नीत पूर्णपणे जळू शकली नाहीत. त्या कर्मांचे फळ आल्यावर तर कष्टांना सहन करून ऋणमुक्त होण्यातच कल्याण आहे. भविष्यासाठी मार्ग निष्कंटक होत आहे. मनात ह्या गोष्टीबद्दल समाधान असले पाहिजे, प्रसन्नता असली पाहिजे की ही संकटे अशा वेळेला येत आहेत जेव्हा आमची धर्मबुद्धी परिपक्व आहे व आम्ही यांना धर्मप्रज्ञेने सहन करण्यात समर्थ आहोत. जरा विचार करा, हेच कष्ट जर एखाद्या अशा जीवनात आले असते जेव्हा आमच्यात किंचितही धर्मबुद्धी नसती तर काय झाले असते ? आम्ही ह्या कष्टांना सहन करू शकत नसल्यामुळे मनाला दूषितच केले असते व ह्या प्रकारे असंख्य नवीन दुष्कर्मे करून आपला भवसंसार वाढवत नेला असता. परंतु आता अशी बाब नाही. आम्हाला ना दुःख आहे, ना कोणाविषयी क्रोध आहे व ना भविष्याविषयी कोणतीही चिंता, भय वा संशय आहे. भविष्याविषयी काय भय असेल ?

आपल्या पूर्वी केलेल्या दुष्कर्मांना जाळू शकण्याचा हा सर्वोत्तम विधी आमच्या हातात आहे. आपल्या पूर्व जन्मात निश्चितच आम्ही अनेक कुशल कर्म केली आहेत व पुण्यपारमी जमा केलेली आहे, म्हणूनच ह्या द्वितीय बुद्धशासनात सद्धर्माच्या संपर्कात आलो आहोत. ह्याबाबत मनात पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे त्या अनंत पुण्य पारमितांच्या बळावर आम्हाला आपल्या सुखद भविष्याची किंचितही चिंता नाही. दुष्कर्मांची फळे मिळत आहेत व त्यांना आम्ही धर्मबुद्धीने सहन करत आहोत. खूपच लवकर चांगल्या कर्मांच्या फळाची वेळही येणारच आहे. त्यामुळे आम्हाला मनात भविष्याविषयी आशा व विश्वास ठेवला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत आमचे मन भयभीत वा चिंतायुक्त होऊ नये. ह्या प्रसंगी वारंवार माझ्या मनात भगवानांची ही मंगलवाणी गुंजते -

**फुट्ठस्स लोकधम्मेहि, चित्तं यस्स न कम्पति।**
**असोकं विरजं खेमं, एतं मङ्गलमुत्तमं।।**

म्हणजे, जीवनात हे आठ लोकधर्म तर सर्वांनाच सहन करावे लागतात. कोणते आठ लोकधर्म ? सुख व दुःख, लाभ व हानी, जय व पराजय, निंदा व प्रशंसा. परंतु भगवानांच्या मार्गावर चालणाऱ्यांवर ह्या लोकधर्मांचा प्रभाव पडत नाही. ह्या लोकधर्माच्या स्पर्शाने त्याचे चित्त प्रकंपित होत नाही. तो अनासक्तभावाने आपल्या चित्ताला शोकरहित राखतो, म्हणजे त्यावर दुःखाच्या वृत्ती उत्पन्न होऊ देत नाही. त्यावर आसक्ती, द्वेष व वैराचे मळ लागू देत नाही व ह्याप्रकारे त्याला विरत मळरहित, स्वच्छ ठेवतो. त्याच्यावर कोणत्याही प्रकारच्या भय वा संशयाच्या वाईट चिंता येऊ देत नाही. ह्या प्रकारे त्याला क्षेमाने भरपूर कल्याणकारक व स्वच्छ राखतो. ह्या प्रकारे 'असोकं विरजं खेमं' बनण्यातच उत्तम मंगल आहे.

हा सद्धर्माचा प्रभाव आहे, विपश्यना प्रज्ञेचा प्रभाव आहे जो आम्हाला ह्या उत्तम मंगल मार्गावर दृढतापूर्वक चालत राहाण्यासाठी शिदोरी प्रदान करतो. धर्माचा हा आधार निश्चितच तेथील परिवाराच्या सर्व सदस्यांनाही ह्याच प्रकारे शिदोरी, बळ प्रदान करत राहील. धर्मात विहार कराल तर धर्माची ज्योती प्रज्ज्वलितच राहील. धर्माचे रक्षण करत राहाल तर धर्म स्वतः तुमचे रक्षण करतच राहील, हेच सर्वोत्तम मंगल आहे.

मंगलाकांक्षी
सत्यनारायण गोयन्का

## बुद्ध स्मृती पार्क, पटना येथे आनापान व साधना

बुद्ध स्मृती पार्क, (पटना रे. जंक्शनसमोर) पटना येथे रोज गुरुदेवांद्वारे सांगितली गेलेली ३० मिनिटांची आनापानाची शिकवण दिली जात आहे. कार्यक्रम - सकाळी आनापान ९.१५ ते ९.४५ वाजेपर्यंत, १०.३० ते ११ वाजेपर्यंत विपश्यना परिचय, आनापान ११ ते ११.३०, पुन्हा विपश्यना परिचय, आनापान १२ ते १२.३०, १२.३० ते १ पर्यंत. सायं. ४.३० ते ५.३० विपश्यना प्रवचन , ५.३० ते ६.३० पर्यंत सामूहिक साधना होते. अधिक माहितीसाठी संपर्क- १) श्री ओमप्रकाश मनरो, ०९४३११४२४०२, २) श्री रामप्रताप यादव, पटना - ०७७३९१३५७३५.

---

### नवे उत्तरदायित्व

#### वरिष्ठ सहायक आचार्य

१. श्री अशोक खोब्रागडे, केंद्र आचार्यांच्या रूपाने सेवा, धम्मगोंद, गोंदिया
२. श्री राजेंद्र प्रसाद, केंद्र आचार्यांच्या रूपाने सेवा, धम्म सलिल.
3. Mrs. Shanti Mather, To serve as Centre Teacher for Dhamma Pataka, South Africa

### नव नियुक्ती

#### वरिष्ठ सहायक आचार्य

1. Mr. Yuth Itchayapruek, Thailand
2. Ms. Sa-nguanwong Khaowisoot, Thailand
3. U Than Htay, Myanmar
4-5. Dr. Tin Maung Yin & Daw Swe Swe Win, Myanmar
6. Dr. (Mrs) Nyunt Nyunt Sein, Myanmar

#### सहायक आचार्य

१. श्रीमती सुनीता चर्बे, नागपूर
२. श्री नोर्बू भूटिया, सिक्किम
३. डॉ. रनबीर खासा, रोहतक
4. 4. Mr. Kaj Lindauer, Germany
5-6. Mr. John & Mrs. Bianca Angel, New Zealand
7. Mr. Maheu Christophe, France
8. Mr. Simone Greco, Italy
9. Mr. G.K. Siriwardena, Sri Lanka
10. Ms. Kanchana Sudkornrayuth, Thailand
11. Ms. Kamolrat Kitmanee, Thailand
12. Ms. Kasira Billamas , Thailand
13. Ms. Piyawan Ukamthorn, Thailand
14. U Tun Tun Oo, Myanmar
15. U Soe Minn Aye, Myanmar
16. Daw Tin Tin Oo, Myanmar
17. Daw Khin Khin Win, Myanmar

#### बाल शिबिर शिक्षक

१-२. श्री परेशभाई व श्रीमती रेखाबेन कलसरिया, सूरत
३. श्री रमेशभाई वाघानी, सूरत
४. श्रीमती जयाबेन पटेल, सूरत
५. डॉ. इला ठक्कर, सूरत
६. श्री राजूभाई राठोड, सूरत
७. डॉ. नीना वैद, नवसारी
८-९. श्री सौरभ व श्रीमती स्टैफी पटेल, बिलीमोरा
१०. श्रीमती लक्ष्मीबेन पटेल, बिलीमोरा
११. श्रीमती केवलबेन भाईदास मोरे, डैंग
१२. सुश्री अश्विनी सुधाकर शिरसाठ, ठाणे
१३. डॉ. संध्या के. शेट्टी, नवी मुंबई
14. Ms. Beata Harendra, Poland
15. Mr. Wiktor Morgulec, Poland
16. Mrs. Vimi Mahesh Jesrani, Oman
17. Mr. Ming Chen, China
18. Miss Yanxi Yang, China

# काही जुन्या सचित्र आठवणी



एका धर्मसभेत जाण्यापूर्वी ब्रह्मदेशी वेशभूषेत (ध्यानरत)



आंतरराष्ट्रीय विपश्यना केंद्रात सयाजी ऊ बा खिन व सहका-यांसोबत



ब्रह्मदेशाच्या एका चर्चासत्रात विचार-विमर्श करतांना




कच्छमध्ये जैन मुनी व साध्वींसोबत जमिनीवर ध्यानमग्न



धम्मगिरीच्या आपल्या कार्यालयात कार्यरत श्री गोयन्काजी



थंड वातावरणात एका अकेंद्रिय शिबिरादरम्यान



ब्रह्मदेशी पारपत्रावर लागलेला श्री गोयन्काजींचा तारुण्यातील फोटो

**Registered No. NSK/271/2014-2016**



१९८१ मध्ये काठमांडूचे पहिले शिबिर
बाहेर जाण्यापूर्वी श्री यदुकुमार सिद्धींच्यासह

## पूज्य गुरुदेवांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त एक दिवसीय महाशिबिर व संघदान

**शरद पौर्णिमा** तसेच **पूज्य गुरूदेवांच्या** पुण्यतिथीनिमित्त **रविवार, २८ सप्टेंबर २०१४ ला पूज्य माताजींच्या उपस्थितीत ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात एक दिवसीय महाशिबिर होईल. ह्यानंतर ३ वाजता पूज्य गुरुदेवांच्या म्यंमातील अस्थी विसर्जन समारोहाचा व्हिडिओ दाखवण्यात येईल. ह्या प्रसंगी सकाळी १० ते ११ वाजेदरम्यान संघदानाचे आयोजन करण्यात आलेले आहे. ह्या संघदानात भाग घेऊन दानपारमी वाढवण्यास इच्छुकांनी कृपया ग्लोबल विपश्यना फाउंडेशन च्या खालील लोकांशी संपर्क करावा. (१) श्री विपीन मेहता, Tel.022-33747510, (२) श्री डेरिक पेगाडो फोन नं. ०२२-३३ ७४७५१२, Email-audits@globalpagoda.org , शिबिर वेळ-** सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत, येथे ३ वाजताच्या अस्थी विसर्जन व्हिडिओ कार्यक्रमात साधना न केलेले लोकही बसू शकतात. नोंदणीसाठी कृपया खालील फोन नंबरांवर वा ईमेलने त्वरित संपर्क साधावा. कृपया नोंदणी केल्याविना येऊ नये व **समग्गानं तपोसुखो** -सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. **नोंदणी संपर्क:-फोननं.**:-०२२-२८४५११७०/०२२-३३७४७५०१-ext.९, ०२२-३३७४७५४३/३३७४७५४४, (फोन नोंदणी सकाळी ११ ते सायं ५ पर्यंत, रोज)
**Online Registration:** www.oneday. globalpagoda.org.

## धम्मपुष्कर, अजमेरची निर्माण प्रगती

धम्मपुष्कर विपश्यना केंद्रात २९ शून्यागारांचा पॅगोडा व काही धम्मसेवक निवास तयार झालेले आहेत. त्या परिसरात जवळपास ८०० वृक्ष लावण्यात आले आहेत. आता पुरूषांचे काही निवास व लघू धम्महॉलचे निर्माण, सोलर वॉटर हीटिंग सिस्टम, काही लाकडी पलंग, महिला व पुरुषांच्या मधील स्थायी फेन्सिंग, झाडांसाठी आधुनिक सिंचन पद्धती व सौंदर्यीकरण इत्यादी अनेक उपयोगी कामे सुरु केली गेली आहेत. ह्या पुण्यवर्धक कामांबाबत अधिक माहितीसाठी व सहयोगासाठी कृपया संपर्क करावा - श्री रवी तोषणीवाल - ९८२९०७१७७८ वा श्री अनिल धारीवाल - ९८२९०२८२७५.

### दोहे धर्माचे

गहन निशा वन भटकून, व्याकुळ हो हरवून।
सहज दाखवे धर्मपथ, गुरू हात पकडून।।
धन्य गुरुदेव मिळाले, करुणेचे भांडार।
अंधास चक्षू मिळाले, सत्य धर्माचा सार।।
काम क्रोधाच्या पूरी, बुडलोच मध्यधार।
मिळे सहाय्य धर्माचे, गुरू देय आधार।।
अंतर्मनाची गहनता, सहज ना ये दिसून।
गुरुवरांची होय कृपा, मुक्ती-युक्ती मिळून।।
धन्य धन्य गुरुदेवजी, धन्य बुद्ध भगवान।
शुद्ध धर्म असाच दिला, होते जगत कल्याण।।

### दोहे धर्माचे

धर्म दिला गुरुदेवने, कैसा अमित अमोल।
दुःखी व्याकुळ जीवास, अमृत घोळ अनमोल।।
अहोभाग्य गुरुदेवा, प्रज्ञा दे जागवून।
मिथ्या वाद विवादाची, बंधने सोडवून।।
गुरुंनी दिली साधना, चाखला धर्म स्वाद।
संगत सुखद संतांची, मनी मिटला विषाद।।
पंथ विसरला दिगभ्रमित, व्याकुळ हो भटकून।
धन्य धन्य गुरुजी दिला, सतपथ दाखवून।।
रोम रोम कृतज्ञ झाले, ऋण न फेडले जाय।
जीवन जगू धर्माचेच, हाची एक उपाय।।

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक व संपादक: राम प्रताप यादव, धम्मगिरी, इगतपुरी-422 403, दूरध्वनी : (02553) 244086, 244076.
मुद्रण स्थान : अक्षर चित्र प्रिंटिंग प्रेस, 69- बी रोड, सातपूर, नाशिक-422 007. **बुद्धवर्ष 2558,** **भाद्रपद** पौर्णिमा, ९ सप्टेंबर , २०१४

**वार्षिक शुल्क** रु. **30/-,** US $ 10, **आजीवन शुल्क** रु. **500/-,** US $ 100. **Registered No. NSK/271/2014-2016**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरि, इगतपुरी - 422 403
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (02553) 244076, 244086, 243712, 243238. **फैक्स :** (02553) 244176
Email: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org